पुण्य नगरी

सोमवार, १३ जानेवारी २०२५

# विवेकानंद कॉलेजमध्ये ग्रंथ प्रदर्शन

कोल्हापूर : स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त तसेच वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत विवेकानंद महाविद्यालयातील ग्रंथालयातर्फे ग्रंथ प्रदर्शन झाले. ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमास सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, सुनील कुलकर्णी, प्रबंधक आर. बी. जोग तसेच प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी स्वागत केले. सहायक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे यांनी आभार मानले.



कोल्हापूर : ग्रंथ प्रदर्शनाची पाहणी करताना प्राचार्य अभयकुमार साळुंखे.

सकाळ

सोमवार, १३ जानेवारी २०२५

# 'विवेकानंद'मध्ये ग्रंथ प्रदर्शन

**कोल्हापूर :** स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त तसेच 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमांतर्गत विवेकानंद महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या वतीने ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले. ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, सुनील कुलकर्णी, प्रबंधक आर. बी. जोग आदी उपस्थित होते. ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी स्वागत केले. सहायक ग्रंथपाल श्री. हितेंद्र साळुंखे यांनी आभार मानले.

पुढारी

सोमवार, १३ जानेवारी २०२५

# विवेकानंद कॉलेजमध्ये ग्रंथ प्रदर्शन

स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त तसेच वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत विवेकानंद महाविद्यालयातील ग्रंथालयातर्फे ग्रंथप्रदर्शन झाले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते ग्रंथप्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले. ग्रंथ प्रदर्शनात स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जीवनावरील ग्रंथ, भारतीय संगीत व कला तसेच दुर्मीळ ग्रंथ ठेवले. सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांनी, विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंद यांचे विचार आत्मसात करण्याचा संदेश साळुंखे यांनी दिला. सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, सुनील कुलकर्णी, प्रबंधक आर. बी. जोग, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी स्वागत केले. सहायक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे यांनी आभार मानले.

1/2025